# सिध्दीविनायक मेट्रो स्थानकात पहिला सरकता जिना

**मुंबई :** कुलाबा -वांद्रे- सीप्झ मुंबई मेट्रो -३ मार्गाचे काम गेल्या काही दिवसांपासून वेगात सुरू असून प्रवाशांना सोईसुविधा देण्याचा कामांना वेग आला आहे. या स्थानकात पहिल्या सरकत्या जिन्याची उभारणी करण्यात आली आहे. यामध्ये एका तासात ७ हजार ३०० प्रवासी वाहून नेण्यास शक्य असून ०.६५ मीटर प्रती सेकंद वेग ठेवण्यात येणार आहे. हा सरकता जिना १८ दिवसांच्या कालावधीत सुरू करण्यात आला असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी दिली.